आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानपरिषदेच्या चार जागांच्या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर, येत्या २६ जूनला मतदान
- डोंबिवली एमआयडीसी स्फोट प्रकरणी आरोपी मालती मेहताला नाशिकमधे अटक
- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताची ज्योती सुरेखा वेन्नम आणि प्रियांश ही जोडी मिश्र सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

**<><><><><><>**

राज्यात मुंबई तसंच कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ आणि नाशिक विभाग तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा विधानपरिषदेच्या चार जागांसाठी येत्या २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगानं आज या निवडणुकीसाठी नव्यानं कार्यक्रम जाहीर केला.

या निवडणुकीसाठी ३१ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी होईल, त्यानंतर ७ जून २०२४ पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. अर्जांची छाननी १० जून २०२४ रोजी होणार असून, १२ जून २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असेल. या चारही मतदारसंघांसाठी २६ जूनला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे, तर मतमोजणी १ जुलै २०२४ ला होणार आहे.

**<><><><><><>**

डोंबिवली एमआयडीसी स्फोट प्रकरणातल्या आरोपी मालती मेहताला आज नाशिक पोलिसांनी पेठरोड इथं अटक केली. दुर्घटनेनंतर त्यांनी नाशिकमध्ये आपल्या एका नातेवाईकाच्या घरी आश्रय घेतला होता. ठाणे गुन्हे शाखेनं मोबाईल लोकेशनवरून त्यांचा शोध घेतला. डोंबिवली इथल्या औद्योगिक वसाहतीतल्या एका कंपनीत काल झालेल्या स्फोटात ९ जण मृत्युमुखी पडले होते तर ६४ पेक्षा जास्त जण जखमी झाले होते. मालती मेहता, या कंपनीच्या मालक आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला पाच लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्यसरकार उचलणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आज पावसाळी कामांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. मुंबईतल्या विविध प्राधिकरणांचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी यावेळी पावसाळ्या निमित्त मुंबई महापालिकेनं केलेल्या उपाय योजनांची माहिती दिली.

**<><><><><>**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांमध्ये सध्या केवळ १० पूर्णांक ६७ शतांश टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. हवेतल्या वाढत्या उष्म्यामुळे तलावांमधल्या पाण्याचं वेगानं बाष्पीभवन होत आहे. मान्सूनचं आगमन लांबलं तर मुंबईवर पाणी टंचाईचं सावट राहील असा अंदाज आहे.

**<><><><><>**

नागपूरमधल्या अंबाझरी धरण भरून वाहिल्यानं निर्माण होणारी पूरस्थिती टाळण्यासाठी धरणाच्या सध्याच्या स्थायी दरवाजातून वाढत्या पाणी पातळीचं व्यवस्थापन केलं जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. धरणातल्या पाण्याच्या निचऱ्यासाठी आणखी तीन दरवाजे उभारले जात आहेत. या कामाची आज फडणवीस यांनी पाहणी केली त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. हे काम येत्या सहा महिन्यात पूर्ण होईल असं त्यांनी सांगितलं. यासोबतच धरण भरून वाहून लागल्यावर प्रवाहात अडथळा ठरत असलेली काही बांधकामंही तोडली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. पूर परिस्थिती टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व तात्पुरत्या व्यवस्थांची सोय केली असल्याचंही फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

पुण्यात खडकवासला इथल्या एनडीए, अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४६ व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा आज पार पडला.  लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी संचलनाचं निरीक्षण केलं.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४६ व्या अभ्यासक्रमाचा दीक्षांत समारंभ काल हबीबुल्लाह सभागृहात पार पडला. हिमाचल प्रदेश केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सतप्रकाश बन्सल, या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. एकूण २०५ कॅडेट्सना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये १७ परदेशी कॅडेट्सचा समावेश होता.

**<><><><><>**

पुण्याच्या एफटीआयआय, अर्थात भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या चिदानंद नाईक या विद्यार्थ्यानं दिग्दर्शित केलेल्या ‘सनफ्लावर्स वेअर द

फर्स्ट वन्स टू नो' (Sunflowers Were The First Ones To Know) या लघुपटाला ७७व्या कान चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा 'ल सिनेफ' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या चित्रपटाचं कथानक कर्नाटकातल्या लोककथेवर आधारित आहे. याचं चित्रीकरण सूरज ठाकुर, संकलन मनोज व्ही. आणि ध्वनिसंयोजन अभिषेक कदम यांनी केलं आहे.

जगभरातल्या ५५५ चित्रपट प्रशिक्षण संस्थांमधून आलेल्या २ हजार २६३ लघुपटांमधून निवड झालेले १८ चित्रपट या पुरस्काराच्या स्पर्धेत होते.

**<><><><><><>**

दक्षिण कोरियात येचिओन इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम आणि प्रियांश या जोडीनं मिश्र सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत या संघानं यजमान देशाच्या हान सेन गियोन आणि यांग जावॉन या जोडीचा पराभव केला.

या विजयाबरोबर भारतानं या स्पर्धेत आपलं दुसरं पदक निश्चित केलं आहे. ज्योती आणि प्रियांश या जोडीचा उद्या अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलिव्हन या जोडीशी सामना होणार आहे. प्रथमेश फुगेनं देखील स्पर्धेच्या वैयक्तिक गटात उपांत्य फेरी गाठली आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत प्रवेशासाठी पात्रता फेरीतला दुसरा सामना आज सनराईजर्स हैद्राबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होणार आहे. चेन्नईच्या एम. ए चिंदबरम स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडे सात वाजता

हा सामना सुरु होईल. राजस्थान रायल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

याच मैदानावर येत्या २६ तारखेला स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे. अंतिम सामन्यात आजच्या सामन्यातल्या विजेत्या संघाची लढत कोलकाता नाईट रायडर्ससोबत होणार आहे.

**<><><><><><>**

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीनं अमरावतीत आंबा आणि भरडधान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये आंब्याच्या विविध प्रजाती तसंच मिलेटचे विविध प्रकार प्रदर्शनात ठेवण्यात आले आहेत. महोत्सवाचं उद्घाटन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते नुकतंच झालं. या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून नैसर्गिक पद्धतीनं पिकवलेला आंबा आणि मिलेट्स पदार्थांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

**<><><><><><>**

बुद्ध पौर्णिमेच्या रात्री सोलापुरातल्या नान्नज अभयारण्यात वन्यप्राणी गणना करण्यात आली. या गणनेत सोलापूरची ओळख असलेला माळढोक पक्षी आढळला. माळढोक सोबतच कुदळ्या पक्षी दिसला असून नीलगायींच्या संख्येतही वाढ झाली आहे.

लांडगा, मुंगुस, ससा, सायाळ, घोरपड यांची संख्या कमी दिसली. तर खोकड, रानमांजर, रानडुक्कर, कोल्हा, मोर, निलगाय आणि काळवीट यांच्या

संख्येत वाढ झाल्याचं आढळून आलं आहे. गणनेत एकूण १४ प्रकारचे प्राणी आणि पक्षी आढळले. त्यांची एकूण संख्या ७५७ इतकी दिसून आली.

**<><><><><>**

लष्कर-ए-तय्यबा या दहशतवादी संघटनेच्या नावानं व्हॉटसअप कॉल करुन तरुणाला धमकावणार्या  दोन जणांना धुळे सायबर पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. यासंदर्भात धुळे शहरातल्या इमरान हारून शेख या तरुणानं पोलिसात तक्रार दिली होती. त्याला गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय कोड असलेल्या क्रमांकावरुन हा कॉल आला होता. या क्रमांकाची माहिती काढली आसता शेख यांच्या परिचयातल्या ऋषीकेश नरेंद्र भांडारकर यानं अंतरराष्ट्रीय व्हर्चुअल नंबरच्या माध्यमातून, खालीद अन्सारी या मित्राच्या मदतीनं हा कॉल केला होता. खोडसाळपणा करण्यासाठी त्यांनी हा कॉल केल्याचं चौकशीत निष्पन्न झाल्याची माहिती पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातल्या गुंज इथले, लष्करी जवान अंकुश एकनाथ वाहुळकर यांच्या पार्थिवावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. दोन दिवसांपूर्वी पश्चिम बंगालमधे सैन्याच्या वाहनाला झालेल्या अपघातात वाहुळकर यांचा मृत्यू झाला. आज गुंज इथं त्यांच्या अंत्यसंसकाराच्या वेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. विशेष पथकानं बिगुल वाजवून सलामी दिली आणि आकाशात बंदुकीच्या तीन फैरी झाडल्या.

**<><><><><>**

**आताच हाती आलेल्या बातमीनुसार -** डोंबिवली दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १३ झाली आहे. ठाणे पोलिसांनी ही माहिती दिली.

**<><><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरीनचा परिसर, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान आणि निकोबार बेटांचा उर्वरित भाग, अंदमान समुद्र आणि पूर्व मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागात पुढे सरकला आहे. येत्या दोन दिवसांत दक्षिण, मध्य, आणि ईशान्य बंगालच्या उपसागरात मान्सूनच्या प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती आहे.

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, मराठवाड्यात हवामान कोरडं राहील. तर विदर्भात पुढले चार दिवस उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.